प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,
कर्जत- ४१०२०१, जि.रायगड

जा.क.प्राकृसंकें/ एकृप/कंठेप/२५८४/२०२२

दिनांकः 23 DEC 2022

## जाहीर प्रसिध्दी (NOTICE)

प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथिल आय एफ एस मॉडेल प्रक्षेत्रावरील निव्वळ कंत्राटी पध्दतीने खरीप २०२२-२०२३ या हंगामामध्ये लागवड केलेली पिके व इतर मॉडेल मधील कामे दि. १० जानेवारी २०२३ ते २० मार्च २०२३ या कालावधीत करावयाची आहेत सदरची कामे करण्यास इच्छुक असणाऱ्या अनुभवी कंत्राटदारांनी सोवत जोडलेल्या कामासाठी आपले दरपत्रक या कार्यालयास दिनांक ०६.०१.२०२३ पर्यत कार्यालयीन वेळेत सादर करावे.सोवत कामाच्या अटी व शर्ती तसेच कामाची यादी आपल्या माहितीसाठी सोवत जोडण्यात आली आहे.

सहयोगी संशोधन संचालक
प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,
कर्जत-४१०२०१ जि.रायगड

**प्रत : प्रसिध्दीसाठी**

१.नोटीस बोर्ड, प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत, जि.रायगड.
२.मा.तहसिलदार, तहसिल कार्यालय, कर्जत, जि.रायगड.
३.मा.कार्यकारी अधिकारी, पंचायत समिती कर्जत, जि.रायगड.
४.मा.मुख्याधिकारी, कर्जत नगर परिषद कर्जत, जि.रायगड.
५.ग्रामपंचायत हलिवली, ता.कर्जत, जि.रायगड.
६.गुपग्रामपंचायत किरवली, ता.कर्जत, जि.रायगड.
७.विद्यापीठ संकेत स्थळ डॉ.वाळासाहेव सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली,जि.रत्नागिरी.

c/3

## प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथिल आय एफ एस मॉडेल प्रक्षेत्रावरील कामे ठेका पध्दतीने करावयाच्या कामाचे दरपत्रक

### दरपत्रकाचा विहीत नमुना

दिनांक

प्रति,

सहयोगी संशोधन संचालक
प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,
कर्जत,जि.रायगड

**विषयः–** प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथिल आय.एफ.एस.मॉडेल प्रक्षेत्रावर प्रायोगिक पिकांची विविध कामे ठेका पध्दतीने करण्यासाठीचे दरपत्रक

**संदर्भः–**जा.क.प्राकृसंकें/एकृप/कंठेप/ /२०२२ दि. / /२०२२

वरील संदर्भित जाहीर प्रसिध्दी पत्रान्वये प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथिल आय.एफ.एस.मॉडेल प्रक्षेत्रावर प्रायोगिक पिकांची विविध कामे ठेका पध्दतीने पूर्ण करण्यासाठीचे दरपत्रक खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

| कामाचा तपशिल | सन २०२२-२३ हंगामासाठी (10 जानेवारी २०२३ ते 20 मार्च २०२३ ) |
|---|---|
| सोबतच्या यादीमध्ये नमुद केलेल्या कामासाठीचे दरपत्रक | रूपये.........<br>अक्षरी रूपये..................... |

दरपत्रका सोबतच्या सर्व अटी व शर्ती मान्य आहेत. तरी कृपया माझे दरपत्रक मंजूर करावे हि विनंती.

आपला विश्वासू,

सही ः

नांवः

पत्ता ः

## कंत्राटी कामाच्या शर्ती व अटी खालील प्रमाणे

१. प्रक्षेत्रावरील कामे संबधीत विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख विभागाच्या आवश्यकतेनुसार नेमून देतील त्याप्रमाणे करणे आवश्यक राहील.

२. कामाच्या देयकाची आदायगी महिना पुर्ण झाल्यावर केली जाईल. त्यासाठी देयक सादर करते वेळी विभाग प्रमुख/प्रक्षेत्र अधिक्षक यांचे काम वेळेत पुर्ण केल्यावावतचा दाखला जोडणे आवश्यक आहे.

३. निविष्ठांचा पुरवठा या विभागामार्फत केला जाईल.

४. ठेकेदाराकडे स्वतःचे पॅन कार्ड बॅक खाते असणे आवश्यक आहे. तसेच ठेकेदाराने कामगारांना कामाचे वेतन व त्याअनुष्यंगीक रक्कम संबधीत कामगारांच्या बॅक खाती जमा करणे आवश्यक आहे.

५. ठेकेदाराने नेमलेल्या मजुरांना शासनाच्या किमान वेतन दरानुसार किमान वेतन दिले जाते असे प्रमाणित करणे आवश्यक आहे.

६. प्रक्षेत्रावरील मालमत्तेचे कामगारांकडून नुकसान झाल्यास ठेकेदारास जबाबदार धरले जाईल.

७. ठेक्यामध्ये असलेल्या मजूरा व्यतिरीक्त प्रक्षेत्रावर गरजेनुसार जादा मजूर लावणेस विहीत कार्यपध्दती आवलंबून नेमण्याचा अधिकार संबधीत विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांना राहील.

८. ठेक्यातील मजूराची किमान व कमाल वयोमर्यादा शासन निर्णयानुसार निश्चित केलेली असावी.

९. याचिका क्र.१५९१/२०१८ संदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबई यांच्या दि.१८ एप्रिल २०१८ च्या निर्णयानुसार अंतरिम स्थगितीस अनुसरून परिच्छेद क्र.५१ (ई) नुसार याचिकाकर्त्या कामगारांस ठेकेदाराने ठेक्यामध्ये सामावून घेणे आवश्यक आहे.

१०. ठेकेदारामार्फत काम करणाऱ्या कर्मचऱ्यांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर किंवा विद्यापीठ प्रशासनावर राहणार नाही.

११. ठेकेदार व्यक्तीस/ संस्थेस उपरोक्त अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल.

१२. ठेक्यासंबधी इतर सर्व अधिकार विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांना /विद्यापीठ प्रशासनाला राहतील.

१३. सदरचा ठेका दि.१०.०१.२०२३ ते २०.०३.२०२३ या कालावधीचा आहे.

वरील शर्ती व अटी एकतर्फी नसून मला त्या मान्य आहेत.

सही :....................

नांव :....................

c/7

## प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथिल एकात्मिक कृषि पध्दती संशोधन प्रकल्पांतर्गत
## आय एफ एस मॉडेल विभाग
## दि.१०.०१.२०२३ ते२०.०३.२०२३ या कालावधीत करावयाच्या कामांची यादी

१. शेळी, कोंबडी संगोपन करणे, कोंबडी विकी करणे, गुरांना नेपिअर वाजरा गवत खाण्यास देणे. गाई धुणे, दुध काढणे व विकी करणे.

२. प्रक्षेत्रावर रब्बी हंगामात लागवड केलेल्या भाजीपाला, वेल वर्गीय पिकांना मंडप करणे, वेनणी करणे,खते देणे, किटकनाशके फवारणे, काढणी करणे, प्रतवारी करून विकी करणे.

३. प्रक्षेत्रावर खरीप हंगामात लागवड केलेल्या भात पिकांची मळणी करणे, साफ सफाई करणे,व पोती भरून भांडारा मध्ये जमा करणे.

४. गांडूळ खत व्यवस्थापन पहाणे.

५. मका व कांदा पिकाची लागवड करणेसाठी पुर्वमशागतीची कामे करणे. लेआऊट करणे, पेरणी करणे फवारणी करणे,पाणी देणे, वेनणी करणे,खते देणे, विकी करणे इ.

६. पशुसंवर्धन संदर्भात आयत्यावेळी उदभवणारी कामे करणे.

७. पिकांनवर किटकनाशक व बुरशीनाशक औषधांची फवारणी करणे.

८. प्रक्षेत्रावरील साफ सफाई करणे.

९. शेळी, गाई व कोंबडी शेडच्या सभोवतालील झाडे झुडपे तसेच गवत काढून परिसर स्वच्छ ठेवणे.

१०. आंबा तसेच आवळा बागेतील गवत काढून साफ सफाई करणे बागेतील झाडांच्या वाळलेल्या फांदया काढणे.

११. नेपिअर वाजरा चारा पीकामधील गवत काढणे, खते देणे, पाणी देणे तसेच दैनांदिन चारा पिकाची कापणी करून गुरांना खाण्यास देणे.

१२. प्रक्षेत्रावरील कुंपण लाकडी/सिमेंट पोल वापरून दुरूस्त करणे.

१३. प्रक्षेत्रावरील आंबा, आवळा बागेत बुरशीनाशके/ किटकनाशके फवारणी करणे.

१४. रब्वी हंगामात लागवड केलेल्या कडधान्ये पिकाची काढणी करणे, मळणी करणे,साफसफाई करणे.

१४. आयत्यावेळी उद्‌भवणारी कामे करणे.

ठेकेदारची सहीः.....................

ठेकेदाराचे नांवः...................